# जिल्हा परिषद, अमरावती

## कॅम्प परिसर, कार्यालय - पंचायत विभाग, जि.प. अमरावती ४४४ ६०२

**ईमेल - mhdyceo@gmail.com** **दुरध्वनी क्रमांक ०७२१- २६६२४७३**

| जावक क्र जिप/पंचायत/ २४७७ /२०२२ | दिनांक १५ / ०८ /२०२२ |
|---|---|

प्रति,

गट विकास अधिकारी
पंचायत समिती ---------------------------- (सर्व)
जिल्हा परिषद, अमरावती

**विषय :- "आम्रवेध" ॲपमध्ये अमरावती जिल्हयातील आंबा वृक्षांची माहिती भरणेबाबत.**

अमरावती जिल्हयाला जैवविविधतेचा फार मोठा संपन्न वारसा लाभला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्याने अमरावती जिल्हयातील आम्रवैभवाची नोदणी करण्याचा निर्णय अमरावती जिल्हा परिषदेने घेतला आहे. यासाठी "आम्रवेध" नावाचे ॲप जिल्हा परिषदेने विकसीत केले आहे.

"आम्रवेध" ॲप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असुन तेथुन ते ॲड्रॉईड मोबाईलवर डाऊनलोड करुन घेता येईल. तसेच www.ambanondanizpamt.com ही वेबसाईट लिंक आहे. प्रत्येक ग्राम पंचायतीने प्रचार प्रसिध्दी करुन आपल्या क्षेत्रातील सर्व आंब्याची माहिती विविध संस्था, जैवविविधता समित्या, वनव्यवस्थापन समित्या, जलरक्षक, स्वेच्छेने सहभागी होणारे कर्मचारी, शाळा - महाविद्यालयीन विद्यार्थी, तसेच नागरीक यांचे माध्यमातुन नोंदणी करुन घ्यावी. यानुसार प्रत्येक गावाची ऑनलाईन 'आंबा नोंदवही' तयार होईल. कृषी अधिकारी (सामान्य) हे पंचायत समिती स्तरावर नोडल अधिकारी म्हणुन काम पाहतील. याबाबत आपले स्तरावर कार्यवाही करुन मोहीम यशस्वी करावी.

**(अविश्यांत पंडा, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**